
# 28 जानेवारी 2022 चालू घडामोडी PDF Download



हॉकी कर्णधार चरणजीत सिंह

**लशींना बाजारातील नियमित वापरास मंजुरी :**

- कोव्हॅक्सिन व कोव्हिशील्ड या करोना प्रतिबंधक लशींचा काही अटींवर प्रौढांसाठी नियमित बाजारात वापर करण्यास भारताच्या औषध नियामकांनी परवानगी दिली.
- तसेच सर्वांना करोना प्रतिबंधक **लशीची पहिली व दुसरी मात्रा,** तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी वर्धक मात्रा उपलब्ध करून देण्यासाठी असलेली सरकारची लसीकरण मोहीम यापुढेही सुरू राहील.
- कोव्हॅक्सिन व कोव्हिशील्ड या लशींना सध्या आपत्कालीन वापरासाठी असलेल्या मर्यादित परवानगीचा दर्जा वाढवून त्यांच्या काही अटींच्या अधीन राहून प्रौढ लोकसंख्येसाठी सामान्य वापर करण्याची परवानगी नियामकांनी दिली आहे.

- यापुढे या दोन लशी खासगी रुग्णालयांमध्ये आधीच निर्धारित केलेल्या कमाल किरकोळ किमतीत उपलब्ध असतील आणि लोक त्या तेथून खरेदी करू शकतील.
- तर नव्या औषधे व नैदानिक चाचण्या **नियम 2019** अन्वये ही मंजुरी देण्यात आली आहे.

**Must Read (नक्की वाचा):**

चालू घडामोडी (27 जानेवारी 2022)

**पाकिस्तान चीनकडून मिळणार आधुनिक तोफा :**

- चीन पाकिस्तानला एकुण **236** अत्याधुनिक SH-15 या तोफा देणार आहे.
- तर या **तोफा 2019** ला चीनच्या लष्करात दाखल झाल्या असून मोठ्या प्रमाणात तिबेटमध्ये भारताच्या सीमेजवळ तैनात करण्यात आल्याची माहिती आहे.
- पाकिस्तानने याआधीच 236 तोफांबाबत करार केला होता, पुढील काही दिवसांत SH-15 तोफांची पहिली तुकडी पाकिस्तानात दाखल होणार असल्याचं वृत्त दिलं आहे.
- चीनची आघाडीची तोफ म्हणून SH-15 कडे बघितलं जात आहे.
- आधुनिक अशा ट्रकवर ही तोफ बसवण्यात आली आहे. यामुळे ही तोफ सहज कुठेही वाहून नेणे शक्य होणार आहे.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे या तोफेतून तब्बल **72 किलोमीटर अंतरापर्यंत मारा** करता येणे शक्य आहे. यामुळेच सीमेपासून सुरक्षित अंतरावरुन शत्रु पक्षाच्या भागात खोलवर मारा करणे शक्य आहे.

**माजी ऑलिम्पिक हॉकी कर्णधार चरणजीत सिंह यांचे निधन :**

- **1964च्या टोक्यो ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेमधील सुवर्णपदक विजेत्या** भारतीय संघाचे संघनायक चरणजीत सिंह यांचे प्रदीर्घ आजारपण आणि हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले.

- ऑलिम्पिकमध्ये चरणजीत यांनी अप्रतिम कामगिरी केली परंतु दुखापतीमुळे त्यांना अंतिम सामन्याला मुकावे लागले आणि पाकिस्तानकडून भारताने **0-1** असा निसटता पराभव पत्करला.
- मग **1964**मध्ये चरणजीत यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अंतिम सामन्यात पाकिस्तानला **1-0** असे नमवून ऐतिहासिक विजेतेपद पटकावले होते.
- 1962च्या आशियाई स्पर्धेमध्ये रौप्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघामध्येही त्यांचा समावेश होता.
- हॉकीमधून निवृत्तीनंतर ते **हिमाचल प्रदेश विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागात संचालक** म्हणून कार्यरत होते.

महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलली :

- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब मुख्य परीक्षा 2021 पुढे ढकलण्यात आली आहे.
- तर या परीक्षेसाठी पूर्व नियोजित उमेदवारांपेक्षा जास्त उमेदवारांना प्रवेश द्यावा लागणार असल्याने आयोगाने छपाई केलेल्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिकांच्या आधारे परीक्षा आयोजित करणे शक्य नसल्याने **20 जानेवारी, 5 फेब्रुवारी आणि 12 फेब्रुवारीला** होणारी परीक्षा पुढील निर्णयापर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.
- तसेच या संदर्भात अंतिम न्यायनिर्णय येईपर्यंत परीक्षेच्या आयोजनासंदर्भातील सर्व प्रक्रिया स्थगित करण्यात येत असल्याचेही आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दिनविशेष:

- स्वातंत्र्यसेनानी पंजाब केसरी तथा लाला लजपतराय यांचा जन्म **28 जानेवारी 1865** मध्ये झाला होता.
- स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख फील्डमार्शल के. एम. करिअप्पा यांचा जन्म **28 जानेवारी 1899** मध्ये झाला होता.

- शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे 4थे अध्यक्ष डॉ. राजा रामण्णा यांचा जन्म **28 जानेवारी 1925** मध्ये झाला होता.
- एच.एम.टी. वॉच फॅक्टरी हा भारतातील पहिला घड्याळांचा कारखाना **सन 1961** मध्ये बंगलोर येथे सुरू झाला.
- **सन 1977** मध्ये मिर्झा हमीदुल्ला बेग यांनी भारताचे 15वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला होता.

# January 2022 chalu ghadamodi PDF Download

| Sr.No. | Name | Links |
|---|---|---|
| 1 | 1 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 2 | 2 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 3 | 3 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 4 | 4 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 5 | 5 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 6 | 6 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |

| Sr.No. | Name | Links |
|---|---|---|
| 7 | 7 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 8 | 8 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 9 | 9 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 10 | 10 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 11 | 11 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 12 | 12 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 13 | 13 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 14 | 14 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 15 | 15 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 16 | 16 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |

| Sr.No. | Name | Links |
|---|---|---|
| 17 | 17 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 18 | 18 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 19 | 19 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 20 | 20 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 21 | 21 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 22 | 22 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 23 | 23 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 24 | 24 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 25 | 25 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |
| 26 | 26 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |

| Sr.No. | Name | Links |
|---|---|---|
| 27 | 27 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download |